**गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..**

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रसह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक ५३ वा ● रविवार ०९ जुलै २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| Volume 1 | Issue 53 | Date : 09/07/2023 | blow : Sunday | Page 4 | Price 4

# गोळीबार...बॉम्ब फेक...बंगालच्या पंचायत निवडणुकीत २६ ठार



बंगाल : पश्चिम बंगालमध्ये आज पार पडत असलेल्या मतदानात हिंसाचाराच्या घटना घडल्या. ठिकठिकाणी झालेल्या हिंसाचारात २६ जण ठार झाले आहेत. मृतांमध्ये तृणमूल काँग्रेस, भाजप आणि माकप-डाव्या आघाडीच्या कार्यकर्त्यांचा समावेश आहे. राज्यात झालेल्या हिंसाचारासाठी सत्ताधारी तृणमूल काँग्रेस जबाबदार असल्याचा आरोप डाव्यांनी आणि भाजपने केला आहे. काही ठिकाणी गोळीबाराच्या घटना घडल्यात, काही ठिकाणी बॅलेट बॉक्स पळवण्यात आले. काही ठिकाणी मतदारांना पळवले जात आहे. पश्चिम बंगालमध्ये पंचायतींच्या ७३,८८७ जागांसाठी मतदान पार पडत आहे. या निवडणुकीसाठी केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या तैनातीची मागणी करण्यात येत होती. केंद्रीय पोलीस दल तैनात असतानादेखील हिंसाचाराच्या घटना घडत आहेत. अनेक ठिकाणी बॉम्बफेक, हिंसाचार, गोळीबाराच्या घटनांचे व्हीडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. काही ठिकाणी बॅलेट बॉक्सला आगी लावण्यात आल्याच्या घटना घडल्या आहेत. बळजबरीने मतदान झाल्याचेही वृत्त आहे.

पंचायत निवडणुकांसाठी मतदान सुरू होण्याआधीच सात जणांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर मतदानाच्या वेळी हिंसाचार वाढला. दुपारपर्यंत एकूण २६ जण ठार झाल्याची माहिती समोर आली.

सत्ताधारी तृणमूल काँग्रेसने भाजप आणि विरोधकांवर निशाणा उलट प्रश्न केला आहे. आमच्या पक्षाचे तीन कार्यकर्ते रेजीनगर, तुफानगंज आणि खारग्राममध्ये ठार झाले आहेत आणि डोमकोलमध्ये दोन जण जखमी झाले आहेत. पश्चिम बंगाल भाजप, पश्चिम बंगाल सीपीआय(एम) आणि पश्चिम बंगाल काँग्रेस केंद्रीय सैन्य तैनात करण्याची मागणी करत आहेत. मग, केंद्रीय दलांची सर्वाधिक गरज असताना ते कुठे आहेत? असा प्रश्न तृणमूलने केला. तृणमूल काँग्रेसच्या कार्यकर्त्यांवर हल्ले होत असल्याचा आरोप पक्षाचे नेते कुणाल घोष यांनी केला. मुर्शिदाबाद पोलीस स्टेशन अंतर्गत बरंडा येथील मतदान केंद्रावर सीपीएमचा पोलिंग एजंटांना मारहाण केल्याचा आरोप टीएमसीवर आहे. मुर्शिदाबाद पोलिसांनी एका मतदान केंद्रातून तीन पोलिंग एजंटांची सुटका केली.

पश्चिम बंगाल काँग्रेसचे अध्यक्ष अधीर रंजन चौधरी यांनी तृणमूल काँग्रेसवर हल्लाबोल केला. सत्ताधारी तृणमूल काँग्रेस, पोलीस प्रशासन आणि निवडणूक आयोगाने बंगालमध्ये दहशतीचे राज्य स्थापन केले आहे. । **पान २ वर**

# ‘आम्ही तिघे म्हणजे विकासाचा त्रिशूळ’

## गडचिरोलीत शिंदे, फडणवीस आणि अजित पवारांची जोरदार फटकेबाजी




गडचिरोली : मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी शनिवारी (८ जुलै) रोजी गडचिरोलीतील पहिल्याच जाहीर कर्यक्रमात सरकारमध्ये सर्व अलबेल असल्याचं सांगितलं आहे. तसेच तिघांची एकत्रित शक्ती भविष्यात राजकीय विजयाची नांदी ठरणार असल्याचं देखील यावेळी त्यांनी म्हटलं आहे. गडचिरोलीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्या उपस्थितीत शासन आपल्या दारी हा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात गडचिरोलीतील ग्रामीण जनतेने मोठ्या प्रमाणात गर्दी केल्याचं चित्र पाहायला मिळालं. सत्तेमध्ये प्रवेश केल्यानंतर पहिल्यांदाच या तिघांनी एका जाहीर कार्यक्रमात एकत्रित हजेरी लावली.

या कार्यक्रमादरम्यान अजित पवार आणि एकनाथ शिंदे एकमेकांशी सहज संवाद साधत असल्याचं पाहायला मिळालं. तर अजित पवार यांनी ही त्यांच्या प्रशासनावरील नियंत्रणाची झलक दाखवल्याचं सांगण्यात येत आहे. या तिघांनी सरकारमध्ये सर्व काही ठीक असल्याचं देखील सांगण्यात येत होतं.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांचे नाव न घेता दोघांवर जोरदार टीका केली. जेव्हा कष्टकरी आणि क्षमता असलेल्या माणसावर अन्याय होतो, तेव्हा अजित पवारांसारखा प्रसंग घडतो असं मुख्यमंत्री शिंदे यांनी म्हटलं. तोंडात अंजीर आणि हातात खंजीर असलेल्यांचे काय करायचे हे अजित पवार यांना कळतं. घरी बसून काम करणाऱ्यांपेक्षा मोकळेपणाने बोलणारे चांगले.अजित पवार तुमच्या नावात जीत आहे. त्यामुळे चिंता नको आपला विजय निश्चित आहे. असल्याचे सूतोवाच ही मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी केलं आहे.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तिघांच्या एकत्रित शक्तीला शंकराच्या त्रिशूळाची उपमा दिली आहे. तसेच शंकराच्या तिसऱ्या डोळ्याची उपमा देत तिघे त्रिशूळ म्हणून काम करणार असल्याचं त्यांनी यावेळी म्हटलं आहे. तसेच जे सामान्य जनतेचा छळ करतील विनाशासाठी । **पान २ वर**

# येवल्यात मी कोणावर टीका करायला नाही तर माफी मागायला आलोय : शरद पवार




मुंबई : महाराष्ट्रात नाशिक जिल्ह्याने गेली अनेक वर्ष पुरोगामी विचाराला साथ दिली आहे. कोणत्याही जिल्ह्यांनी साथ सोडली नाही, आज मी इथे आलोय तर ते कोणावर टीका करण्यासाठी नाही, आज मी माफी मागण्यासाठी आलो आहे. माझा अंदाज फारसा चुकत नाही, पण इथं माझा अंदाज चुकला. माझ्या विचारावर तुम्ही साथ दिली. पण माझ्या निर्णयामुळे तुम्हाला यातना झाल्या. त्यामुळे माझं कर्तव्य आहे की तुम्हा सगळ्यांची माफी मागायची, म्हणून आज इथे आल्याचे शरद पवार म्हणाले.

राष्ट्रवादीच्या फुटीनंतर पहिल्यांदा शरद पवार यांची येवल्यात जाहीर सभा पार पडली. या सभेत शरद पवार बोलत होते. ते म्हणाले की, ज्यावेळी कधी तुमच्यासमोर येण्याची वेळ येईल. आज येईल, उद्या येईल, महिन्यात येईल, वर्षांनी येईल. त्यावेळी मी पुन्हा तुमच्यासाठी येईल. त्यावेळी योग्य निकाल सांगेल. त्यावेळी अंदाज चुकणार नाही. राजकारण कधी करायचं तर सामान्य माणसांच्या प्रश्नासाठी, कामगारांच्या विकासासाठी, शेतकऱ्यांच्या हितासाठी. स्वातंत्र्य चळवळीत देखील हा तालुका, जिल्हा नेहमीच अग्रभागी राहिलेला आहे. नाशिक जिल्हा विकासाच्या बाबतीत पुढे जात आहे. मात्र येवला मतदारसंघात आजही अनेक प्रश्न आहेत. त्या प्रश्नांना पुढे घेऊन जाण्यासाठी आम्ही सोबत असून तुमची माफी मागण्याचे माझे कर्तव्य असल्याचे शरद पवार म्हणाले.

शरद पवार पुढे म्हणाले की, एक काळ असा होता की, ज्यात चुका झाल्या असतील, तर त्या दुरुस्त केल्या पाहिजे म्हणून आम्ही झगडत होतो. मात्र आज परिस्थिती बदलली आहे. काही दिवसांपूर्वी मोदींनी भाषणात काँग्रेसवर टीका केली, राष्ट्रवादीवर भ्रष्टाचाराचा आरोप केला. माझं पंतप्रधान यांना सांगणे आहे की आम्ही भ्रष्टाचार केला असेल तर, असेल नसेल तर सर्व यंत्रणा वापरा, जर आम्ही दोषी असलो तर कारवाई करा, आमची जी काही चौकशी करायची ती करा, जो काही निष्कर्ष निघेल, तो आम्ही स्वीकारायला तयार आहे, अन्यथा माफी मागा, असे आव्हान शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दिले आहे.

शरद पवार यांच्या वयाबाबत काही दिवसांपासून टीका केली जात आहे. यावर देखील पवार यांनी प्रत्युत्तर देत म्हणाले की, ‘माझं वय ८२ झाले हे खरं’ पण माझ्या वयाचे बाबत बोलू नका, महागात पडेल, असा इशाराच दिला आहे. काही लोक बोलले की तुमचं वय झाले, आता थांबलं पाहिजे, वय झालं आहे, हे खरं आहे, पण तुम्ही गडी पाहिलाय कुठे? असे जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. उगा वयाबियाच्या भानगडीत पडु नका, महागात पडेल, कार्यक्रमावर टीका करा पण व्यक्तिगत टीका करू नका, असा सल्लाही पवार यांनी दिला आहे. जनतेने दिलेल्या विश्वासाला कुणी तडा देत असेल कोणी विश्वात करत असेल तर ते आम्ही खपून घेणार नाही जर कोणी असं करत असेल तर त्याची किंमत आज ना उद्या त्याला द्यावी लागेल असा इशारा देखील पवारांनी दिला आहे.

# रेल्वे प्रवाशांसाठी खुशखबर!

## आता रेल्वे प्रवास होणार स्वस्त

### वंदे भारतसह इतर रेल्वे तिकीटात २५ टक्क्यांपर्यंत कपात



नवी दिल्ली : रेल्वे मंत्रालयाने रेल्वेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना एक खुशखबर दिली आहे. वंदे भारतसह सर्व गाड्यांचे एसी चेअर कार आणि एक्झिक्युटिव्ह क्लास आणि विस्टाडोम कोचचं भाडं २५ टक्क्यांपर्यंत कमी केलं जाणार आहे, अशी माहिती रेल्वे मंत्रालयाने दिली आहे. ट्रेनमध्ये जास्तीत जास्त जागांचं आरक्षण व्हावं, यासाठी भाड्यात कपात केली जाणार असल्याचं रेल्वेनं सांगितलं. रेल्वेचं भाडं आता स्पर्धात्मक पद्धतीने ठरवण्यात येणार आहे. रेल्वेमधील आरामदायी सुविधांचा वापर प्रवाशांना करता यावा, या दृष्टीने रेल्वे मंत्रालयाने हा निर्णय घेतल्याचं म्हटलं आहे. एसी प्रवास सुविधा असलेल्या गाड्यांमध्ये सवलतीच्या दराची योजना लागू करण्याचा निर्णय रेल्वेने घेतला आहे. ही योजना एसी चेअर कार । **पान २ वर**

# कमी शुल्कात परदेशातील उच्च शिक्षण उपलब्ध करण्यासाठी विद्यापीठांनी पुढाकार घ्यावा : राज्यपाल रमेश बैस



मुंबई : राज्यातील विद्यार्थ्यांना कमी शुल्कात परदेशातील नामांकित विद्यापींठामध्ये उच्च शिक्षण घेता यावे, यासाठी विद्यापीठांनी परदेशी विद्यापीठांसोबत सामंजस्य करार करावेत, असे प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी केले.एसएनडीटी महिला विद्यापीठ, चर्चगेट, मुंबई येथे श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी (एसएनडीटी) महिला । **पान २ वर**

## शाळांच्या विकासासाठी तब्बल १४ कोटी ३० लाख रुपयांचा निधी

# राज्यातील १३ ऐतिहासिक गावांमधील १३ शाळांचा होणार कायापालट

मुंबई : राष्ट्रनिर्मितीत मोलाचे योगदान देणाऱ्या आणि स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या महात्मा जोतिबा फुले यांच्यापासून ते क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या जन्मगावातील शाळांचा विकास करण्याचा निर्णय शिंदे फडणवीस सरकारने घेतला आहे. या निर्णयामुळे राज्यातील १३ ऐतिहासिक गावांमधील १३ शाळांचा कायापालट होणार आहे. त्यासाठी सरकाराने तब्बल १४ कोटी ३० लाख रुपयांचा निधी जाहीर केला आहे.

पुरोगामी महाराष्ट्राची जडणघडणीत महापुरूषांचे मोठे योगदान आहे. तसेच महाराष्ट्राच्या मातीत जन्मलेल्या महापुरूषांच्या शाळांचा विकास करण्याचा हा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. राज्यातील महापुरुषांशी संबंधित १३ शाळांच्या विकासासाठी तब्बल १४ कोटी ३० लाख रुपयांचा निधी जाहीर करण्यात आला आहे. अहमदनगरच्या चौंडी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, अमरावतीमधील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गाडगे बाबा, अमरावतीच्या शिक्षण महर्षी कृषिरत्न डॉ. पंजाबराव देशमुख, कोल्हापूरची राजर्षी शाहू महाराज आणि नाशिकमधील कुसुमाग्रजांची शाळांचा कायापालट होणार आहे.

पुण्यातील महात्मा जोतिबा फुले शाळेचा विकास करणार आहे. तसेच रत्नागिरीतील महर्षी धोंडो केशव कर्वे व साने गुरुजी शाळा तसेच सांगलीतील लोकशाहीर साहित्य रत्न अण्णाभाऊ साठे व क्रांतिसिंह नाना पाटील शाळांचा चेहरामोहरा बदलणार आहे. साताऱ्यातील भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर व सावित्रीबाई फुले शाळांसाठी निधी मंजूर करण्यात आला आहे. या शाळांमध्ये महापुरुषांचे कार्य । **पान २ वर**

# शरद पवार यांचं माझ्यावर अतोनात प्रेम, म्हणून माझा नंबर पहिला : ना.छगन भुजबळ



नाशिक : शरद पवार यांचं माझ्यावर अतोनात प्रेम आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष ज्यावेळी निर्माण झाला, त्यावेळी पक्ष उभारणीसाठी मी स्वतः उभा राहिलो होतो. त्यानंतर बाकीचे अनेक दिवसांनी एकत्र आले, कुणी निवडणूक लढवून कुणी प्रवेश करून पक्षात आले. मात्र सर्वांचा माझ्यानंतर नंबर लागतो, माझा नंबर पहिलाच असतो अशी प्रतिक्रिया मंत्री छगन भुजबळ यांनी दिली आहे.

अजित पवार गटाचे मंत्री छगन भुजबळ हे नाशिकला येत असून ठिकठिकाणी त्यांचे स्वागत करण्यात येत आहे. नुकतेच ते इगतपुरीत दाखल झाल्यानंतर स्थानिक कार्यकर्त्यांकडून जोरदार स्वागत करण्यात आले. यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. अजित पवार गटाबरोबर शपथविधी घेतल्यानंतर छगन भुजबळ पहिल्यांदा नाशिकमध्ये आले असून दुसरीकडे राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार हे देखील नाशिकमध्ये असून आज सायंकाळी चार वाजता येवला शहरात त्यांची जाहीर सभा होत आहे. दुसरीकडे भुजबळांकडून जोरदार शक्ती प्रदर्शन केले जात आहे.

छगन भुजबळ इगतपुरीत दाखल झाल्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. । **पान २ वर**

# पुण्यात अचानक बत्ती गुल्ल; नागरिकांचे हाल

पुणे : पॉवर ग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेडच्या (पीजीसीआयएल) ४०० केव्ही शिक्रापूर ते तळेगाव अतिउच्चदाबाची एक वीजवाहिनी तुटल्याने आज (दि. ८ जुलै) सकाळी ९ च्या सुमारास पिंपरी चिंचवड परिसर, शिक्रापूर, उर्से, थेऊर, पेरणे आदी परिसरातील ग्राहकांचा वीजपुरवठा बंद पडला होता. मात्र पावसामुळे विजेची मागणी कमी झाल्यामुळे तुटलेल्या अतिउच्चदाब वीजवाहिनीचा भार इतर वीजवाहिन्यांवर देण्यात आला आणि भारव्यवस्थापनाद्वारे या सर्वच भागात दुपारी १२: ४५ वाजेपर्यंत टप्प्याटप्प्याने वीजपुरवठा सुरू करण्यात आला आहे. पीजीसीआयएलच्या शिक्रापूर ते तळेगाव ४०० केव्हीच्या अतिउच्चदाबाच्या चारपैकी एक वीजवाहिनी तळेगाव एमआयडीसीजवळ आज सकाळी ९ वाजता तुटली. त्यामुळे सुमारे ३५५ मेगावॅट विजेचे । **पान २ वर**

**✻ सुविचार ✻**

गुलाब देणाऱ्या हातांना त्याचा सुगंध चिकटल्याशिवाय राहात नाही.

## संपादकीय

### प्रयत्न होणे गरजेचे..

शेती क्षेत्राला व्यवसाय म्हणून फार मोठे महत्त्व होते. शेतकरी, शेतमजूर, ग्रामीण जनता यांना मानाचे स्थान होते. कारण खेड्यांची संख्या फार मोठी होती. मोठमोठी साम्राज्येच जणू खेड्यामध्ये दिसत होती. सर्व सोयींनीयुक्त अशी विस्तीर्ण खेडी अस्तित्वात होती. त्यावेळी शहरांची संख्या कमी होती. शहरांचा आवाकाही कमी होता. शेतीमध्ये सर्व प्रकारची पिके जमीनदार घेत होते. मर्यादित असणाऱ्या शहरांना विविध गरजांसाठी खेड्यांवर अवलंबून राहावे लागत होते. ग्रामीण भागात शेतीत काम करताना शेतकरी, शेतमजूर यांच्यात मेहनतीची प्रवृत्ती मोठ्या प्रमाणावर दिसून येत होती. माध्यमांचा पुरेसा विकास झालेला नव्हता. तंत्रज्ञान फारसे आधुनिक नव्हते. त्यामुळे एकूणच खेड्यांमधील मुख्य व्यवसाय म्हणून शेतीला मोठ्या प्रमाणावर मानसन्मान होता, मोठी प्रतिष्ठा होती. कालांतराने लहान- मोठ्या नोकऱ्यांच्या मागे धावणाऱ्या तरुणांचे प्रमाण वाढू लागल्याने आणि शेकडो एकर जमीन असणाऱ्या मोठ्या शेतकऱ्याचा मुलगा शहरी भागात दोन-पाच हजारांच्या पगारावर काम करू लागला. ही प्रवृत्ती वाढत चालली. आजही शेतकरी, ग्रामीण जनता यातील बहुतेक लोक हे अशिक्षित, अडाणी आहेत असा अनेकांचा गैरसमज आहे. प्रामाणिकपणा, साधी राहणी, मनमोकळेपणाने बोलणे, माणुसकी, पाहुणचार, समोरच्याचा आदर करणे हे गुण असताना वाढत्या शहरी वातावरणाने त्यांना दुर्बल ठरविले. शहरांच्या वाढत्या साम्राज्याबरोबर हे गुण आपोआपच कमी होताना दिसतात. अशा परिस्थितीत हे गुण ज्या कुटुंबात दिसतील त्यांना समाजात प्रतिष्ठाच नाही, असा गैरसमज बहुतेक लोकांनी करून घेतला आहे. तंत्रज्ञानात फार मोठ्या प्रमाणावर प्रगती झाली, पण त्याचा वापर शेती क्षेत्रात फारसा झालेला नाही. याव्यतिरिक्त इतर क्षेत्रात हा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला. त्यामुळे त्या क्षेत्रांची प्रगती आणि शेती व्यवसायाची अधोगती झाली. काही वर्षांपूर्वी उत्तम शेती, मध्यम यापार आणि कनिष्ठ नोकरी असे समीकरण होते. नाईलाज म्हणून लोक त्यावेळी नोकरी करीत होते.आज उत्तम नोकरी, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ शेती असे समीकरण झालेले दिसून येते. आजचे तरुण हे नाइलाजाने शेती करतात. ज्यांना कितीही प्रयत्न करून नोकरी मिळत नाही ते शेवटी शेतीवर नाइलाज काम करतात. यात आपली मनोवृत्ती जोपर्यंत बदलत नाही तोपर्यंत यामध्ये फरक पडत नाही. यामध्ये बदल करण्यासाठी शहरी जनता, तरुण, सामाजिक कार्यकर्ते, विविध संघटना, शासन अशा सर्वच घटकांकडून प्रयत्न होणे गरजेचे आहे.

पान १ वरुन

### गोळीबार...बॉम्ब फेक...

मृतांची संख्या २६ वर पोहोचली आहे आणि शेकडो लोक जखमी झाले आहेत. बंगालमधील राजकीय आणि निवडणुकीचे वातावरण हिंसाचाराने भरलेले आहे. ही लोकशाही आणि पंचायत निवडणुकांची फसवणूक आहे. हे निवडणूक गैरप्रकारांचे ज्वलंत उदाहरण असल्याची टीका त्यांनी केली. माकपचे पश्चिम बंगालचे राज्य सचिव मोहम्मद सलीम यांनीदेखील निवडणुकीतील हिंसाचाराला तृणमूल काँग्रेसला जबाबदार धरले आहे. सलीम यांनी काही व्हीडिओ ट्वीट करत मतपत्रिका प्रकारे बळकावल्या गेल्याचा आरोप केला.

पंचायत निवडणुकीच्या हिंसाचारात बंगाल पेटत असल्याची टीका विरोधी पक्षनेते सुवेंदू अधिकारी यांनी केली. ममता बॅनर्जी आणि त्यांचा पुतण्या अभिषेक बंगाल लुटण्याचे काम करत असल्याची टीका त्यांनी केली.राज्य निवडणूक आयुक्त राजीव सिन्हा हे टीएमसी कार्यकर्त्यांप्रमाणे वागत असल्याचा आरोप त्यांनी केला.

### ‘आम्ही तिघे म्हणजे..

आम्ही शंकराचा तिसरा डोळा ही होणार असल्याचे फडणवीसांनी म्हटलं. तर याच कार्यक्रमात अजित पवारांनी त्यांची प्रशासनावरील पकड मजबूत आहे याची झलक दाखवली. गडचिरोली मधील अधिकाऱ्यांना गडचिरोलीत राहून जनतेचे काम करण्याची तंबी अजित पवारांनी यावेळी दिली आहे. जेव्हा मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि इतर मंत्री गडचिरोलीत येतात, तेव्हा मंत्रालयातील सचिवांनी देखील इथे हजर राहायला हवं. प्रशासनातील अधिकाऱ्यांनी गडचिरोलीत पोस्टिंग असताना नागपुरात राहून नोकरी करू नये, त्यांनी मुख्यालयात राहिले पाहिजे असं अजित पवार यांनी म्हटलं आहे.

### रेल्वे प्रवाशांसाठी खुशखबर!

आणि एक्झिक्युटिव्ह क्लास असणाऱ्या सर्व रेल्वे गाड्यांना लागू होणार आहे. यामध्ये अनुभूती आणि व्हिस्टाडोम कोच असणाऱ्या रेल्वेंसह वंदे भारत एक्स्प्रेसचाही समावेश आहे. या डब्यांमधील प्रवाशांची संख्या वाढवण्यासाठी हा निर्णय घेतला आहे. रेल्वे मंत्रालयाने सांगितल्याप्रमाणे, मूळ भाड्यावर २५ टक्क्यांपर्यंत सूट लागू केली जाणार आहे. आरक्षण शुल्क, सुपर फास्ट अधिभार जीएसटी सारखे इतर शुल्क स्वतंत्रपणे आकारले जातील.

गेल्या ३० दिवसांत ज्या गाड्यांमध्ये ५० टक्क्यांपेक्षा कमी जागा आरक्षित आहे, अशा गाड्यांमध्ये सवलत देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. ही सवलत त्वरित प्रभावाने लागू केली जाईल.

रेल्वेने दिलेल्या माहितीनुसार, ही सवलत तात्काळ प्रभावीपणे लागू होणार आहे. अर्थात, ज्यांनी आधीच तिकीट बुक केलं आहे अशा प्रवाशांना भाड्याचा परतावा दिला जाणार नाही.

वंदे भारतसह इतर सुपरफास्ट एक्स्प्रेसचं तिकीट हे फार जास्त होतं, त्यामुळे तिकीटांचे दर कमी करण्याची मागणी बऱ्याच दिवसांपासून होत होती. त्यासाठीच भारतीय रेल्वे तिकिटांच्या किमती कमी करण्यासाठी आणि प्रवाशांसाठी अधिक व्यवहार्य प्रवास बनवण्यासाठी रेल्वेने तिकीट भाड्याच्या कपातीचा निर्णय घेतला आहे.

# प्रत्यक्षात आणला शेती समृद्धीचा जाहिरनामा; एक रूपयात दिला पीक विमा !

विविध नैसर्गिक आपत्तींमुळे पिकाच्या होणाऱ्या नुकसानीपासून शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण देण्याच्या दृष्टिकोनातून राज्यात प्रधानमंत्री पीक विमा योजना २०१६-१७ पासून राबविण्यात येत आहे. २०२३-२४ मध्ये राज्यात ही पीक विमा योजना बीड पॅटर्न (८०:११०) आधारित राबविली जाणार आहे. यामध्ये विमा कंपनीवर नुकसान भरपाईचे जास्तीत जास्त दायित्व एकूण विमा हप्त्याच्या ११० टक्यांपर्यंत असणार आहे, या पेक्षा जास्त असणारी नुकसान भरपाई राज्य शासन देईल. नुकसान भरपाई एकूण विमा हप्त्याच्या ८० टक्यांपेक्षा कमी आल्यास विमा कंपनी एकूण विमा हप्त्याच्या २० टक्के रक्कम स्वतःकडे नफा म्हणून ठेऊन उर्वरित शिल्लक रक्कम राज्य शासनास परत करणार आहे. या योजनेच्या माध्यमातून सन २०१६-१७ पासून ते २०२२-२३ पर्यंत साधारण रुपये २२हजार ६२९ कोटीची नुकसान भरपाई मंजूर झाली आहे.



**योजनेतील पिके** : भात(धान), खरीप ज्वारी, बाजरी, नाचणी(रागी), मका, तूर, मूग, उडीद, सोयाबीन, भुईमूग, तीळ, सूर्यफूल, कारळे, कापूस, कांदा.

**सहभागी शेतकरी** : अधिसूचित क्षेत्रात, अधिसूचित पिके घेणारे (कुळाने अगर भाडेपट्टीने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांसह) सर्व शेतकरी या योजनेत भाग घेण्यास पात्र आहेत. पीक कर्ज घेणाऱ्या आणि बिगर कर्जदार शेतकऱ्यांना योजनेतील सहभाग ऐच्छिक राहील. भाडेपट्टीने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना पीक विमा पोर्टल वर नोंदणीकृत भाडे करार अपलोड करणे बंधनकारक आहे.

✻ योजनेत सहभागासाठी अंतिम मुदत - ३१ जुलै २०२३

✻ सर्व पिकांसाठी जोखीमस्तरः ७० टक्के

✻ विमा हप्ता : सर्व पिकांसाठी प्रती अर्ज फक्त एक रुपया.

**उंबरठा उत्पादन :** अधिसूचित क्षेत्रातील, अधिसूचित पिकांचे उंबरठा उत्पादन हे मागील ७ वर्षातील सर्वाधिक उत्पादनाची ५ वर्षाचे सरासरी उत्पादन गुणिले त्या पिकाचा जोखीमस्तर विचारात घेऊन निश्चित केले जाते.

**यासाठी मिळेल संरक्षण**

✻ पीक पेरणीपासून काढणीपर्यंतच्या कालावधीत पिकांच्या उत्पादनात येणारी घट.✻ पीक पेरणीपूर्व /लावणीपूर्व नुकसान : यात अपुरा पाऊस, हवामानातील इतर प्रतिकूल घटकांमुळे अधिसूचित मुख्य पिकाची त्या भागातील सर्वसाधारण क्षेत्राच्या ७५ टक्यांपेक्षा जास्त क्षेत्रावर पेरणी/लावणी होऊ शकली नाही तर विमा संरक्षण देय आहे.✻ हंगामातील प्रतिकूल परिस्थितीत पूर,पावसातील खंड,दुष्काळ इत्यादी बाबींमुळे शेतकऱ्यांच्या अपेक्षित उत्पादनात उंबरठा उत्पादनाच्या ५०टक्यांहून अधिक घट अपेक्षित असेल तर विमा संरक्षण देय आहे.✻ काढणी पश्चात चक्रीवादळ,अवेळी पाऊस यामुळे कापणी/काढणी नंतर सुकवणीसाठी शेतात पसरवून ठेवलेल्या अधिसूचित पिकाचे नुकसान झाल्यास वैयक्तिक स्तरावर पंचनामे करून नुकसान भरपाई दिली जाते.✻ स्थानिक नैसर्गिक आपत्ती अंतर्गत विमा संरक्षित क्षेत्र जलमय झाल्यास,भूस्खलन व गारपीट या स्थानिक नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसानग्रस्त झाल्यास अधिसूचित पिकाचे नुकसान हे वैयक्तिक पंचनामे करून निश्चित करण्यात येते.✻ युद्ध व युद्धजन्य परिस्थितीमुळे होणाऱ्या व हेतू पुरस्सर केलेल्या नुकसानीस व इतर टाळता येण्याजोग्या धोक्यास विमा संरक्षण मिळत नाही.

**ई-पीक पाहणी:** शेतकऱ्याने लागवड केलेल्या पिकाची नोंद ई-पीक पाहणीमध्ये करावी. विमा योजनेत विमा घेतलेल्या पिकात आणि ई पीक पाहणी मध्ये नोंदवलेल्या पिकात काही तफावत आढळल्यास ई पीक पाहणी मध्ये नोंदवलेले पीक अंतिम गृहीत धरण्यात येईल.

**या विमा कंपन्या देणार जिल्हानिहाय सेवा**

भारतीय कृषी विमा कंपनी (वाशीम, बुलडाणा, सांगली, नंदुरबार, बीड), ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी लि. (नगर, नाशिक, चंद्रपूर, सोलापूर, जळगाव, सातारा), आयसीआयसीआय लोंबार्ड जनरल इन्शुरन्स कंपनी लि.(परभणी,वर्धा, नागपूर),युनायटेड इंडिया जनरल इन्शुरन्स कंपनी लि. ( नांदेड, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग),एचडीएफसी इर्गो जनरल इन्शुरन्स कंपनी लि.(हिंगोली,अकोला, धुळे,पुणे, उस्मानाबाद), युनिव्हर्सल सोम्पो जनरल इन्शुरन्स कंपनी लि.(जालना, गोंदिया, कोल्हापूर), चोलामंडलम एम एस जनरल इन्शुरन्स कंपनी लि. (औरंगाबाद, भंडारा, पालघर, रायगड),रिलायन्स जनरल इन्शुरन्स कंपनी लि.(यवतमाळ, अमरावती, गडचिरोली), एसबीआय जनरल इन्शुरन्स कंपनी लि.(लातूर),खरीप हंगामातील सर्वसाधारण पीक निहाय विमा संरक्षित रक्कमेत जिल्हानिहाय फरक संभवतो

**पीकनिहाय विमा संरक्षणाची रक्कम (रुपये प्रति हेक्टर)**

भात ( ४० हजार ते ५१ हजार ७६०),ज्वारी ( २० हजार ते ३२ हजार ५००),बाजरी ( १८ हजार ते ३३ हजार ९१३),नाचणी ( १३ हजार ७५० ते २० हजार ),मका ( ६ हजार ते ३५ हजार ५९८), तूर ( २५ हजार ते ३६ हजार ८०२),मूग ( २० हजार ते २५ हजार ८१७),उडीद ( २० हजार ते २६ हजार ०२५),भुईमूग ( २९ हजार ते ४२ हजार ९७१),सोयाबीन ( ३१ हजार २५० ते ५७ हजार २६७),तीळ ( २२ हजार ते २५ हजार ),कारळे ( १३ हजार ७५०),कापूस ( २३ हजार ते ५९ हजार ९८३),कांदा ( ४६ हजार ते ८१ हजार ४२२)

**नुकसान भरपाईसाठी**

✻ स्थानिक नैसर्गिक आपत्ती, काढणी पश्चात नुकसान या बाबी अंतर्गत पिकांचे नुकसान झाल्यास ७२ तासांच्या आत याबाबत नुकसानीची सूचना संबंधित शेतकऱ्याने संबंधित विमा कंपनीस कळविणे बंधनकारक. ही सूचना केंद्र शासन पीक विमा प, संबंधित विमा कंपनी टोल फ्री क्रमांक, विमा कंपनीचे तालुका / जिल्हास्तरीय कार्यालय, संबंधित बँक, कृषी/महसूल विभागाद्वारे देण्यात यावी. यात नुकसान ग्रस्त क्षेत्राचे सर्वेक्षण करून नुकसान भरपाई रक्कम निश्चित केली जाते. ✻ खरीप २०२३ च्या हंगामात उत्पादन आधारित नुकसान भरपाई निश्चित करताना महसूल मंडल/ तालुक्यात पीक कापणी प्रयोगाद्वारे आलेले सरासरी उत्पादन हे उंबरठा उत्पादनापेक्षा कमी आल्यास खालील सूत्रानुसार नुकसान भरपाईची रक्कम काढली जाते.✻ सरासरी उत्पादन काढताना कापूस, सोयाबीन, भात या निवडक पिकाचे बाबतीत रिमोट सेन्सिंग तंत्रज्ञान द्वारे प्राप्त उत्पादनास ३० टक्के आणि पीक कापणीद्वारे प्राप्त उत्पादनास ७० टक्के भारांकन देऊन पिकाचे सरासरी उत्पादन निश्चित केले जाणार आहे. उर्वरित पिकांचे बाबतीत पीक कापणीद्वारे प्राप्त उत्पादन गृहीत धरले जाणार आहे .

**नुकसान भरपाई मिळण्यासाठी**

✻ नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे आकस्मात नुकसान झाल्यास ७२ तासांच्या आत याबाबत केंद्र शासन पीक विमा -झझ, संबंधित विमा कंपनी, संबंधित बँक, कृषी/महसूल विभाग किंवा टोल फ्री क्रमांक याद्वारे कळवावे.यात नुकसान ग्रस्त क्षेत्राचे सर्वेक्षण करून नुकसान भरपाई रक्कम निश्चित केली जाते.✻ संपूर्ण हंगामात विविध कारणांमुळे अधिसूचित क्षेत्रातील पिकाच्या सरासरी उत्पादनात उंबरठा उत्पादनापेक्षा घट आल्यास वरील सूत्रानुसार नुकसान भरपाईची रक्कम अंतिम केली जाते. सदर अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांकरिता विमा योजनेत भाग घेतलेल्या सर्व शेतकऱ्यांना त्याप्रमाणे नुकसान भरपाई त्यांचे बँक खात्यात जमा केली जाते.✻ विमा योजनेतंर्गत सर्व प्रकारची नुकसान भरपाई रक्कम संबंधित शेतकऱ्याच्या बँक खात्यावर जमा करण्यात येते. त्यामुळे बँक खाते योग्य नोंदविण्याची खबरदारी शेतकऱ्यांनी घ्यावी.

**सहभागी होण्यासाठी**

✻ अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकासाठी पीक कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यास या विमा योजनेत सहभाग बंधनकारक नाही. मात्र त्या साठी शेतकऱ्याने विमा योजना भाग घेण्याच्या अंतिम दिनांक आधी किमान ७ दिवस संबंधित बँकेस विमा हप्ता न भरणे बाबत लेखी कळविणे गरजेचे आहे.✻ इतर बिगर कर्जदार शेतकऱ्याने आपला ७/१२ चा उतारा, बँक पासबुक, आधार कार्ड, पीक पेरणीचे स्वयं घोषणापत्र घेऊन प्राधिकृत बँकेत विमा अर्ज देवून, हप्ता भरून सहभाग घ्यावा. हप्ता भरलेली पोहोच पावती त्याने जपून ठेवावी.✻कॉमन सर्विस सेंटर आपले सरकार च्या मदतीने आपण विमा योजनेत सहभाग घेऊ शकता किंवा ु.षिलू.र्सीं.ळप या पोर्टलचे साहाय्य घेऊ शकता.

**महत्त्वाच्या नवीन बाबी**

✻ या योजनेत आपण जे पीक शेतात लावले आहे त्याचाच विमा घ्यावा. शेतात विमा घेतलेले पीक नसेल तर आपणास विमा नुकसान भरपाई पासून वंचित राहावे लागेल. शेतातील पीक आणि विमा घेतलेले पीक यात तफावत आढळल्यास ई पीक पाहणी मधील नोंद अंतिम धरण्यात येईल.म्हणून सर्व शेतकऱ्यांनी आपल्या पिकाची नोंद ई पीक पाहणी मध्ये वेळेवर करावी.✻ या वर्षी भात, कापूस, सोयाबीन पिकांमध्ये महसूल मंडल मधील पिकाचे सरासरी उत्पादन नोंदवताना रिमोट सेसिंग तंत्रज्ञानाचा वापर करून येणाऱ्या उत्पादनास ३० टक्के भारांकन आणि पीक कापणी प्रयोग द्वारे आलेल्या उत्पादनास ७० टक्के भारांकन देऊन मंडळाचे सरासरी उत्पादन निश्चित केले जाणार आहे .✻ भाडे कराराद्वारे पीक विमा योजनेत सहभाग घेणाऱ्या शेतकऱ्यांना नोंदणीकृत भाडे करार प्रत पीक विमा पोर्टल वर अपलोड करावी लागेल.✻ पीक विमा योजनेत सहभागी होण्यापूर्वी मयत असलेल्या शेतकऱ्याच्या नावे अथवा त्याचे नावे असलेल्या जमिनीवर विमा योजनेत भाग घेतल्याचे निदर्शनास असल्यास विमा अर्ज अपात्र होईल .

योजनेच्या अधिक व अद्ययावत माहितीसाठी संबंधित विमा कंपनी , स्थानिक कृषी विभागाच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

**रणजितसिंह राजपूत, जिल्हा माहिती अधिकारी, नंदुरबार**

### राज्यातील १३ ऐतिहासिक गावांमधील

सांगणारे संग्रहालय, शाळेचा दर्जा सुधरणे, प्रयोगशाळा, लॅब या सारख्या सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

अर्थसंकल्पीय अधिवेशनात आमदार बनकर यांनी कुसुमाग्रजांची पहिली ते चौथीपर्यत शिक्षण झालेल्या प्राथमिक विद्या मंदिराच्या विकासासाठी निधी मिळण्याची मागणी केली. त्यानंतर उपमुख्यमंत्र्यांनी एक कोटी रूपयांचा विकासनिधी देण्याची घोषणा करण्यात आली. पिंपळगावच्या प्राथमिक शाळेच कष्टकऱ्यांची मुले शिक्षण घेतात. सध्या जुनी इमारत मोडकळीस आली असून धोकादायक स्थितीत आहे. निधीची घोषणा झाल्याने इमारतीसह उद्यान व पायाभूत सुविधा शाळेच्या प्रांगणात उभारता येणार आहे.

### शरद पवार यांचं माझ्यावर..

ते म्हणाले की, मी नाशिककर जनतेचा मनापासून आभारी आहे. मुंबईपासून नाशिक दौऱ्याला सुरवात केल्यानंतर ठाणे, कल्याण, भिवंडी अनेक ठिकाणी कार्यकर्ते, बंधू, भगिनी मोठया प्रमाणावर स्वागतासाठी उपस्थित होते. याचा अर्थ असा आहे की अजितदादा पवार आणि आम्ही घेतलेला निर्णय जनेतला पसंत पडलेला आहे. त्या निर्णयाला पाठिंबा देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर कार्यकर्ते आणि जनता सुद्धा स्वागताच्या रूपाने उपस्थित आहे. नाशिकला येत असताना अनेक ठिकाणी स्वागत झाले असून ठाणे, कल्याण, भिवंडी, मुलुंड या ठिकाणीही मोठ्या संख्येने समर्थक जमल्याचे भुजबळ म्हणाले.

भुजबळ पुढे म्हणाले की, आत सर्व निर्णय झाला असून त्यांच्या आशीर्वादाने आम्ही कामाला लागलो आहोत. ज्या ज्या वेळेला मला संधी मिळाली, त्या वेळेला नाशिक जिल्ह्यात मोठं काम उभं केलं आहे. या संधीचा उपयोग शेतकऱ्यांसाठी, बेरोजगारांसाठी, जनतेसाठी, कामगारांसाठी होईल. आज शरद पवार यांची येवल्यात म्हणजेच मतदारसंघात सभा होत असल्याचे विचारल्यावर भुजबळ म्हणाले की, शरद पवार यांचं माझ्यावर अतोनात प्रेम आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष ज्यावेळी निर्माण झाला, त्यावेळी पक्ष उभारणीसाठी मी स्वतः उभा राहिलो होतो. त्यानंतर बाकीचे अनेक दिवसांनी एकत्र आले, त्यामुळे माझा नंबर पहिलाच असतो, असेही ते म्हणाले.

### कमी शुल्कात परदेशातील उच्च..

विद्यापीठाचा १०८ वा वर्धापन दिन सोहळा संपन्न झाला. याप्रसंगी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकास चंद्र रस्तोगी, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा. उज्ज्वला चक्रदेव, ज्येष्ठ गायिका अनुराधा पौडवाल, विभागप्रमुख, प्राध्यापक शिक्षक- शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

राज्यपाल बैस म्हणाले, आर्थिक अडचणींमुळे अनेक विद्यार्थ्यांना इच्छा असून सुद्धा परदेशात उच्च शिक्षण घेता येत नाही आणि परदेशातील विद्यार्थ्यांना सुद्धा आपल्या देशात उच्च शिक्षण घेता येत नाही म्हणून परदेशातील ज्या विद्यापीठांचे विद्यार्थी आपल्याकडे येतील त्या विद्यापीठांमध्ये त्याच शिक्षण शुल्कात आपले विद्यार्थी शिक्षण घेतील असा करार करावा, असे आवाहन राज्यपाल श्री. बैस यांनी यावेळी केले.

राज्यपाल म्हणाले, या विद्यापीठाचा १०७ वर्षांचा प्रदीर्घ आणि गौरवशाली प्रवास आहे. महिला विद्यापीठाने केवळ ज्ञानाद्वारे महिलांना सक्षम केले नाही तर लाखो कुटुंबांचा सामाजिक-आर्थिक स्तरही उंचावला आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने उच्च शिक्षणातील महिलांसाठी एकूण नोंदणी प्रमाण (GER) सध्याच्या २७.९ टक्क्यांवरून २०३५ पर्यंत ५० टक्क्यांपर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

महिलांसाठी व्यावसायिक आणि कौशल्यावर आधारित विषयांचे अभ्यासक्रम उपलब्ध करून हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी विद्यापीठाची महत्त्वाची भूमिका आहे. कौटुंबिक जबाबदाऱ्या स्वीकारल्यानंतर अनेक महिलांचे शिक्षण अपूर्ण राहते. त्यासाठी विद्यापीठाने स्वतःचा मुक्त आणि दूरस्थ शिक्षण विभाग सुरू करून उच्च शिक्षणापासून वंचित महिलांपर्यंत पोहोचावे. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी पोषक वातावरण निर्माण करून त्यांना उद्योजकतेचे प्रशिक्षण कसे देता येईल यासाठी सुद्धा प्रयत्न करावा, असेही राज्यपाल श्री. बैस यांनी यावेळी सांगितले.

सांस्कृतिक कार्य मंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले, भारत देश जगाला हेवा वाटावा असा ज्ञानसंपन्न व गुणसंपन्न देश आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत हा आत्मनिर्भर, विश्वगौरव देश होण्याच्या दिशेने वाटचाल सुरू आहे. देशाच्या विकासात महिलांचे योगदान महत्त्वाचे आहे. महिलांमध्ये अधिक सहनशीलता, कल्पकता असते.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, महिला दैनंदिन जीवनात अगदी सहजतेने विविध भूमिका आत्मविश्वासाने पार पाडतात. नवीन शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून विद्यापीठाने नवीन अभ्यासक्रम विकसित करून महिला सक्षमीकरणासाठी अधिक प्रोत्साहन द्यावे. या महिला विद्यापीठाचे केंद्रीय विद्यापीठ व्हावे, यासाठी केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठवण्यात येईल, असे सांगून मंत्री श्री. पाटील यांनी या विद्यापीठाच्या १०८ व्या स्थापना दिनानिमित्त अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी कुलगुरू उज्वला चक्रदेव यांनी विद्यापीठाचे सादरीकरण करून कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. दरम्यान विद्यापीठाच्या शैक्षणिक वाटचालीवरील लघुपट दाखवण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत आणि विद्यापीठ गीताने करण्यात आली.

### पुण्यात अचानक बत्ती..

वहन ठप्प झाले होते. मात्र पावसामुळे विजेची मागणी कमी झाल्याने इतर वीजवाहिन्यांवर हा भार देत भारव्यवस्थापनाद्वारे पर्यायी स्वरुपात वीजपुरवठा सुरळीत करण्यात महावितरण व महापारेषणला यश आले. त्यामुळे बाधीत झालेल्या पिंपरी गाव, रहाटणी, पिंपळे सौदागर, काळेवाडी, चिंचवड गाव, वाल्हेकरवाडी, रावेत, देहू रोड, खराडी, जुना मुंढवा, थिटेवाडी, थेऊर, पेरणे, शिक्रापूर, कोरेगाव भिमा, सणसवाडी, कोरेगाव मूळ, रांजणगावचा काही भाग आदी परिसरातील वीजपुरवठा टप्प्याटप्प्याने दुपारी १२: ४५ पर्यंत सुरु करण्यात आला. त्यामुळे वीजग्राहकांना मोठा दिलासा मिळाला.

दरम्यान, पॉवर ग्रीडच्या तुटलेल्या अतिउच्चदाब वीजवाहिनीच्या दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# निवडणुका कधीही लागू शकतात, आरपारची लढाई आहे, आगामी महानगरपालिका, लोकसभा, विधानसभा निवडणुका जिंकण्याच्या दृष्टिने तयारीला लागा : चेतन नरोटे

सोलापूर/प्रतिनिधी : निवडणुका सप्टेंबर, ऑक्टोम्बर मध्ये लागतील म्हणून निवडणुका आयोगाचा आदेश आला असून आज रोजी माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे साहेब, प्रदेश कार्याध्यक्षा आमदार प्रणिती शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली बूथ कमिटया स्थापन करून पक्ष संघटना मजबूत करण्यासंर्दभात सोलापुर शहर काँग्रेस कमिटी ब्लॉक, फ्रंटल अध्यक्ष, मा. नगरसेवक नगरसेविका आणि पदाधिकारी यांची महत्वाची बैठक सोलापुर शहर काँग्रेसचे अध्यक्ष चेतन नरोटे यांनी काँग्रेस भवन सोलापुर येथे आयोजित केली. यावेळी बोलताना चेतन नरोटे म्हणाले की, निवडणुका जिंकण्यासाठी बूथ कमिटया स्थापन करणे खुप महत्वाचे असून काँग्रेस पक्षाचे कार्य, सत्ताधाऱ्यांचे जनताविरोधी धोरण जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी, निवडणुकीत जनतेपर्यंत प्रत्यक्ष पोहोचण्यासाठी, बूथ लेवल कार्यकर्ता हा महत्वाचा आहे. बूथ पातळीवर कार्य चांगले असेल तरच आपण निवडणूक जिंकु शकतो. कालच निवडणुक आयोगाचा आदेश आला सप्टेंबर ऑक्टोम्बर मध्ये निवडणुका लागू शकतील जनता केंद्रातील आणि राज्यातील खोके सरकारच्या जनताविरोधी कार्यपद्धतीवर नाराज आहेत. चारच दिवसापूर्वी मोदी साहेबांनी ज्या पक्षावर भ्रष्टाचाराचे आरोप केले त्यांना पावन करून सत्तेत सहभागी करून घेतले हे लोकांना रुचलेले नाही. काँग्रेस पक्षावर लोकांचा विश्वास वाढत आहे. अनेक जण काँग्रेसमध्ये येण्यास इच्छुक आहेत. निवडणुका कधीही लागू शकतात आरपारची लढाई आहे. त्यामुळे सर्वसामान्य जनता गोरगरीब केंद्रबिंदु मानुन काम करा. आगामी महानगरपालिका, लोकसभा, विधानसभा निवडणुका जिंकण्यासाठी, लोकशाही, संविधान वाचविण्यासाठी प्रत्येक प्रभाग आणि वार्ड मध्ये बूथ कमिटया स्थापन करून पक्ष मजबूत करण्याचे काम पदाधिकारी कार्यकर्त्यांच्या सहकार्याने करणार असल्याचे सांगितले.यावेळी शहर अध्यक्ष चेतन नरोटे, कार्याध्यक्ष संजय हेमगड्डी, प्रवक्ते अशोक निंबर्गी, महिला अध्यक्षा प्रमिला तुपलवंडे, मा. नगरसेवक शिवा बाटलीवाला, प्रवीण निकाळजे, हाजी तौफ़ीक़ हत्तूरे, विनोद भोसले, नरसिंग कोळी, दत्तू बंदपट्टे, रफीक इनामदार, मा. नगरसेविका फिरदौस पटेल, प्रदेश चिटणीस किसन मेकाले, हेमाताई चिंचोळकर, वरिष्ठ उपाध्यक्ष सुनील रसाळे, ब्लॉक अध्यक्ष देवीदास गायकवाड़, उदयशंकर चाकोते, बाबूराव म्हेत्रे, सेवादल अध्यक्ष भीमाशंकर टेकाळे, अल्पसंख्याक अध्यक्ष जुबेर कुरेशी, मध्य विधानसभा युवक अध्यक्ष वाहिद बिजापुरे, शौकत पठाण, तिरुपती परकीपंडला, युवराज जाधव, सुमन जाधव, अशोक कलशेट्टी, राजेंद्र शिरकुल, विवेक कन्ना, नूर अहमद नालवार, वसिष्ठ सोनकांबले, वैभव पाटील, चक्रपाणी गज्जम, दिनानाथ शेळके, संजय गायकवाड, पृथ्वीराज नरोटे, नागेश बोमड्याल, शोभा बोबे, विनाताई देवकते, संध्याताई काळे, वैभव पाटील, शिवशंकर अंजनाळकर, रजाक कादरी, कय्यूम बलोलखान, श्रीनिवास पोटाबत्ती, श्रीशैल रणदिवे, श्रीकांत दासरी, शुभांगी लिंगराज, चंद्रकला निजमल्लू, मीणा गायकवाड, अरुणा भालेराव, कोंडनताई काकड़े यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.



# डॉ.सत्येंद्र राऊत यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रमाने साजरा



अणदूर/प्रतिनिधीः अणदूर येथील जवाहर महाविद्यालयातील संस्कृत विभागप्रमुख तसेच शैक्षणिक व सामाजिक कार्यात नेहमी हिरारीने सढळ हाताने मदत करणारे प्रा. डॉ. सत्येंद्र राऊत यांनी प्रत्येक वर्षाप्रमाणे विविध उपक्रमाच्या माध्यमातून यावर्षीही आपल्या वाढदिवसानिमित्त दहावी व बारावी परीक्षेत संस्कृत विषयात शंभर मार्क्स घेणार्या आणि सीईटी परीक्षेत ९९.९३ टक्के व नीट परीक्षेत ५६४ गुण घेऊन अप्रतिम यश संपादन केल्याबद्दल आर्यन राऊत याचा व सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा फेटा, हार व पुष्पगुच्छ देऊन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

प्रारंभी प्रास्ताविकपर भाषणात प्रा. राऊत म्हणाले – संस्कृत ही सर्व भाषांची जननी असून संस्कृत साहित्यात भारतीय संस्कृतीचे दर्शन घडून येते. संस्कृत भाषेमुळे स्मरणशक्ती वाढते आणि अनेक भाषा लवकर अवगत करता येतात. संस्कृत साहित्य हा समाजाचा आरसा आहे. अशाप्रकारे संस्कृत भाषेचे स्वरूप व महत्व सविस्तरपणे स्पष्ट करुन संस्कृत विषयात यश संपादन करणार्या सायली मैत्री, ज्योति नरे, मुस्कान अतार, नाजिया कुरणे, सुमैय्या कुरणे, उज्वला भुजबळ, सुलक्षणा ठाकुर, प्रियंका ढाकणे, प्राजक्ता गाढवे, पूनम चव्हाण, अनिकेत चौगुले , गणेश मुळे आणि नीट परीक्षेत उत्तम गुण घेतलेल्या ऋतुराज नाईक, अभिजीत निर्मळे यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाप्रसंगी सौ. उषा धाकतोडे, पत्रकार मा. राजेंद्र स्वामी, वैशाली करपे आणि सुरेश चव्हाण यांनी सविस्तरपणे विचार मांडले आणि सर्व विद्यार्थ्यांचे हार , फेटा व पुष्पगुच्छ देऊन पुढील शैक्षणिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे आयोजन सौ. दीपमाला राऊत, संहिता राऊत व प्रा. सत्येंद्र राऊत यांनी केले होते. या कार्यक्रमाला सतीश धाकतोडे, कोल्हे सर, काटकर साहेब, चव्हाण साहेब , राजेश देवसिंगकर आणि पालक वर्ग बहुसंख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाच्या शेवटी कु. ज्योती नरे हिने आयोजक आणि उपस्थितांचे आभार मानले.

# पोलिस निरीक्षक सेवानंद वानखेडे यांचे नागरी सत्कार

अकोट/प्रतिनीधीः पोलीस निरीक्षक सेवानंद वानखेडे दहीहांडा पोलीस स्टेशन यांचा सामाजिक कार्य लक्षात घेऊन जऊळका ता. अकोट येथील नागरिकांनी नागरी सत्कार करून सन्मानित केले. सेवानंद वानखेडे आपले कर्तव्य बजावताना सामाजिक कार्यामध्ये सुद्धा अग्रेसर असतात. आंबेडकरवादी विचारधारा व चळवळच देशात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करून सर्व सामान्य माणसाला न्याय मिळवून देऊ शकते. यावर गाढ विश्वास असणारे सेवानंद वानखेडे आपले कर्तव्य बजावून सामाजिक कर्तव्याचीही जाणीव ठेवतात. नोकरी व पैसा आल्यानंतर समाजाकडे पाठ फिरवणारे अनेक लोक आपल्या डोळ्यासमोर असतात. परंतु सेवानंद वानखेडे सरांसारखे समाजात सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी, कायदा व संविधानाची जनजागृती करण्यासाठी सतत झटत असतात त्यांचे हे मौलिक कार्य दुर्लक्षित करून चालणार नाही. सेवानंद वानखेडे नेहमी सर्व सामान्य व्यक्तीच्या सानिध्यात राहुन त्यांना आंबेडकवादी चळवळ, भारतीय संविधान याविषयी मार्गदर्शन तर करतात च परंतु तरुणांनी वेगवेगळ्या माध्यमातून अर्थाजन करावे व आपल्या कुटुंबाला आर्थिकदृष्ट्या मजबूत करावे हा त्यांचा सल्ला तरुणांना नेहमी प्रोत्साहन देत असतो. याचीच जाणीव ठेवून व सेवानंद वानखेडे यांचे कार्य लोकांपर्यंत पोहचावे म्हणून जऊळका ग्रामस्थांनी त्यांचा नागरी सत्कार सुमेद घनबहादूर साहेब यांच्या हस्ते करून सन्मानित केले. सुमेध घनबहादूर साहेब देखील शासकीय पदाधिकारी असुन आंबेडकरवादी विचारधारा, चळवळ व सामाजिक ऐक्याला प्रोत्साहन देऊन सामाजिक कर्तव्य पार पाडतात.



अशा सामाजिक प्रश्नांची जाणिव असलेल्या पदाधिकारी यांचे कार्य जनतेपर्यंत पोहचावे व इतरांना ही प्रेरणा मिळावी म्हणून जऊळका गावातील आंबेडकरवादी नागरिकांनी हा सत्कार घडवून आणला.सत्कार समारंभाला माजी उपसभापती ज्ञानेश्वरभाऊ बोरोकार, सरपंच अवचार, सुमेध घनबहादूर, प्रकाश घनबहादूर, दिपक शेटे, नितेश धांडे, सतिश काठोळे तसेच ग्रामपंचायत सदस्य व गावकरी उपस्थित होते.

# माणुसकी सामाजिक सस्थेच्या वतीने भारतीय सैन्य दलातील कॅप्टन पदी संदीप गवळी यांची नियुक्त झाल्याबद्दल सत्कार

सोलापूर/प्रतिनिधी :माणुसकी बहुउद्देशीय सामाजिक संस्था व सद्गुरू बहुउद्देशीय सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यामाने नान्नजपुत्र संदीप सुनील गवळी (भोसले) यांचे भारतीय सैन्य दलातील कॅप्टन पदी नियुक्त झाल्याबद्दल सत्कार समारंभ व वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न माणुसकी बहुउद्देशीय सामाजिक संस्था नान्नज व सद्गुरु बहुउद्देशीय सामाजिक संस्था सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमानाने संदीप सुनील गवळी (भोसले) यांचे भारतीय सैन्य दलातील कॅप्टन पदी नियुक्त झाल्याबद्दल सत्कार समारंभ व वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न प्रथम सैन्य दलातील कॅप्टन संदीप गवळी (भोसले) आपल्या वयाच्या ३१ वर्षी कॅप्टनपद पदार्पण केल्यामुळे त्या वृक्षांचे त्यांच्या हातून वृक्षारोपण करण्यात आले. सद्गुरु बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे अध्यक्ष भाग्यश्री वंजारे , शुभांगी लचके तसेच माणुसकी फाउंडेशनचे अध्यक्ष श्रीकांतजी मुळे , सचिव खंडू आवटे , उपाध्यक्ष सागर माने , ज्ञानेश्वर दुधाळ, कयूम शेख, ज्ञानेश्वर डोंगरे, सारंग म्हणणे, भैय्या शेळके, अजय बोंगे, रामेश्वर यादव, हणमंत विटकर, सारंग भोसले, बंडू मोहरे, आनंद भोरे,महेश होगाडे , पंपू गुरव, सचिन भोसले, समाधान गोसावी, अजय बोंगे, अफजल शेख, नंदू गवळी, नवनाथ हुके , यतीराज दडे ऋषिकेश तोडकर. (पोलीस पाटील), भारत बोंगे, ओम हूके आदींची उपस्थिती होती.



# श्री श्री गुरुकुल अणदूर मध्ये घडवले जातात शिस्तप्रिय आणि संस्कारी विद्यार्थी

## पावसात उभे राहून चिमुकल्या विद्यार्थ्यांनी केला राष्ट्रगीताचा आदर

नळदुर्ग/एस.के.गायकवाड : श्री श्री गुरुकुल अणदूर ता.तुळजापूर येथे शाळा सुटत असताना पावसाची सुरुवात झाली.आपण भिजू नये या काळजीने सर्व विद्यार्थी गाडीकडे पळत होते पण कानावरती वंदे मातरम चा आवाज येताच शाळेतील शिक्षकांनी दिलेली शिकवण इयत्ता पहिली मध्ये शिकणारा विद्यार्थी चि.मेघ अमोल पाटील याच्या कानावरती आली आणि कसलाच विचार न करता शिस्त म्हणजे शिस्त या गोष्टीची अनुभूती देत चि.मेघ पाटील यांनी वंदेमातरंम हे राष्ट्रगीत संपेपर्यंत पावसात उभे राहून राष्ट्रगीताचा आदर केला. चि.मेघ अमोल पाटील हा तुळजापूर तालुक्यातील श्री श्री गुरुकुल अणदूर येथे इयत्ता पहिली मध्ये शिकत असून त्यांची शाळा सुटली असता पावसात भिजू नये म्हणून सर्व मुले गाडीकडे धावत सुटले इतक्यात वंदेमातरम हे राष्ट्रगीत सुरु झाले.राष्ट्रगीत कानावर पडताच इ.पहिली मध्ये शिकत असलेला मेघ पाटील हा झाडाच्या कट्याच्या काठावर राष्ट्रगीत संपेपर्यंत स्तब्ध उभे राहून राष्ट्रगीताचा आदर ठेवला.

सदर प्रसंगावरुन मेघ पाटील यांचे वडिल अमोल पाटील वागदरीकर म्हणाले की श्री श्री गुरूकुल अणदूर येथे मुलांना ज्ञाना सोबत शिस्त, सुसंस्कार आणि राष्ट्र भक्तीचे पण धडे दिले जातात.याबद्दल समाधान वाटले.असे म्हणत त्यांनी सर्व शिक्षकांचे आभार व्यक्त केले. चि.मेघच्या या गुणांचे गुरूकुलचे संस्थापक डॉ जितेंद्र कानडे,मुख्याध्यापक शिवराज भुजबळ, मुख्याध्यापक लक्ष्मण नरे यांनी कौतुक केले.




# नळदुर्ग येथे स्वातंत्र्य सैनिक मच्छिंद्र बनसोडे याना आभिवादन

वागदरी/प्रतिनिधी : नळदुर्ग ता.तुळजापूर येथील स्वातंत्र्य सैनिक दिवंगत मच्छिंद्र मारूती बनसोडे याना त्यांच्या अकराव्या स्मृती दिनाच्या निमित्ताने आभिवादन करण्यात आले. स्वातंत्र्य सैनिक दिवंगत मच्छिंद्र बनसोडे यांच्या अकराव्या स्मृती दिनानिमित्त नळदुर्ग येथे त्यांच्या समाधी स्थळी आभिवादनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रारंभी दिवंगत मच्छिंद्र बनसोडे यांच्या प्रतिमेचे व समाधीचे उपस्थित मान्यवर यांच्या हस्ते पुजन करून आभिवादन करण्यात आले. याप्रसंगी बोलताना परिवर्तन सामाजिक संस्थेचे सचिव मारुती बनसोडे म्हणाले की फुले-शाहू-आंबेडकर चळवळीतील निष्ठावंत कार्यकर्ते तथा मराठवाडा मुक्ती संग्राम लढ्यातील स्वातंत्र्य सैनिक दिवंगत मच्छिंद्र बनसोडे यांनी मराठवाडा मुक्ती संग्राम लढ्यात फार मोठे योगदान दिले असून त्यांचे कार्य हे भावी पिढीला प्रेरणादायी आहे. तेंव्हा शासनाने त्यांच्या कार्याची दखल घेऊन नळदुर्ग शहरात स्वातंत्र्य सैनिक स्मृती स्तंभ उभारणे गरजेचे आहे. यावेळी बौद्धचार्य दादासाहेब बनसोडे, रिपाइं (आठवले)चे दुर्वास बनसोडे, एस.के.गायकवाड, देवानंद बनसोडे, प्रकाश गायकवाड,माजी नगरसेवक किशोर नळदुर्गकर,प्राण कांबळे, राजू बनसोडे, विजय बनसोडे, संजय बनसोडे, अमित बनसोडे सह महिला कार्यकर्ते उपस्थित होते.



# शब्दकोडे क्र ५३



आडवे शब्द १. मुंबईत २००८ साली झालेल्या अतिरेकी हल्ल्यात वीरगती प्राप्त झालेले तीन प्रमुख अधिकारी ३. अनाथ ११. कारस्थान १२. खंदक १३. अंड्यातील पिवळा भाग १५. मलईदार बासुंदी १७. धोबी १९. गुजराथी नृत्यप्रकार २२. वितरण २३. फळातील द्रव २४. कोलकाताचे विमानतळ २७. ठावठिकाणा २८. युवक २९. विचित्र ३१. बांबूचे कुसळ ३२. केस काळे करण्याचे साधन ३४. गर्दभ ३५. दयाळू ३७. कोर्टातील दावा ३८. बारीक दगड ३९. हट्टी, दुराग्रही ४१. शिखर,ढिगाचा चिंचोळा भाग ४३. बडबड्या ४४. धडक ४८. शाहिरजवळचे एक छोटे चर्मवाद्य ५०. कापडी बंद, फत ५१. एक ध्वज, एक रंग ५२. कडू ५३. खांद्यावरून घेण्याचे वस्त्र ५४. एक सुगंधी पांढरे फूल ५५. नम्र, वाकलेला ५७. काम लांबणे ५९. नुकताच सरलेला दिवस ६०. परीक्षा, निवड ६२. कठीण प्रसंग ६३. वाद्य वाजवणारा ६५. एका घराण्याचे राज्य ६७. प्रश्न ६९. रम्य ७१. कुत्रा ७३. मध्यस्थ ७५. रुचीहीन ७७. पाठोपाठ ७८. पटल ७९. गाव, नगर ८०. मृत्यूदेवता ८२. रक्षण करणारा ८३. आणि ८४. उत्कर्षाचा काळ उभे शब्द १. बांगड्यांचा व्यवसाय करणारा २. छोटा डोंगर ३. बक्षीसाचा पल्ला ४. पदार्थ शिजतानाचा आवाज ५. सारक ६. तात्पर्य ७. कसदार ८. खोडण्याचे साधन ९. कुबड १०. शरीर १४. लुच्चा १६. फासळी १८. जपजाप्य १९. ढीग २०. नड २१. विहीर २२. दुर्गंधी येऊ लागलेला २३. तोफगाडी २५. सुगंधी पाने २६. अंत:करण २७. नमुनेदार २९. अपमान ३०. वाईट याअर्थी लागणारा प्रत्यय, उदा.कुख्यात ह्य नाम ३३. कपाळ ३६. सुदैवी ३७. चिकटविण्यासाठी वापरला जाणारा एक पदार्थ ३८. शाब्दिक हजामत ४०. मातीमोल ४२. मगज ४६. शरीर, अवयव ४७. हुशार, चुणचुणीत ४९. लोकर (इंग्रजी) ५१. लवकर, वेगाने ५३. मेहरबानी ५६. सर्वनाश (हिंदी) ५७. पहारेकरी ५८. झाकणाचे पात्र ५९. कावळा ६१. आवड, रुची ६३. किराणा व्यापारी ६४. कीव करण्याजोगे ६५. ढग, दाट ६६. शाळेतील शिक्षक ६८. सत्ता ७०. सुसर ७१. नाकावाटे हवा घेणे ७२. जनावर ७४. दहाचा संच ७६. वाळूवर रेघा ओढून भविष्य सांगणे ८१. मयूर

# माढा लोकसभा मतदारसंघात निघणार राष्ट्रीय समाज पक्षाची जनस्वराज यात्रा : सुनिल बंडगर

अक्कलकोट/प्रतिनिधीः राष्ट्रीय समाज पक्ष आयोजित जनस्वराज यात्रा माढा लोकसभा मतदारसंघात सोमवार दिनांक १० जुलै रोजी सकाळी आठ वाजता श्री विठ्ठल रखुमाई मंदिर पंढरपूर येथून राष्ट्रीय समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा माजी मंत्री आमदार महादेवजी जानकर यांच्या नेतृत्वाखाली सुरुवात होणार आहे अशी माहिती राष्ट्रीय समाज पक्षाचे पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष सुनील बंडगर यांनी दिली आहे. पंढरपूर तालुक्यातून ठिक सकाळी आठ वाजता या रॅलीला सुरुवात होऊन दिनांक १० आणि दिनांक ११ हे दोन दिवस माढा लोकसभा



मतदारसंघातील प्रत्येक तालुक्यातून शेकडो चार चाकी गाड्यांच्या ताफ्यात ही रॅली जाणार आहे. राष्ट्रीय समाज पक्षाच्या मिशन माढा लोकसभा मतदारसंघातील ऐतिहासिक , धार्मिक, संस्कृतिक, शक्ती स्थळांना अभिवादन करत प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी या रॅलीचे सभेत रूपांतर होऊन मार्गदर्शन केले जाणार आहे. हा कार्यक्रम भव्य दिव्य पद्धतीने पार पडण्यासाठी राष्ट्रीय समाज पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी आपापल्या भागात या रॅलीचे जोरदार स्वागत करत यात सहभाग नोंदवावा असे आवाहन राष्ट्रीय समाज पक्षाचे पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष सुनील बंडगर यांनी केले आहे.



# दुधनी येथे मोरया प्रिमियर लिग क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन

अक्कलकोट/प्रतिनिधीः दुधनी येथील अग्निशमन केंद्राजवळील क्रिकेट मैदानावर मोरया प्रिमियर लिग सिजन हाफ स्पिच क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन मुख्याध्यापक पोमू राठोड यांच्या हस्ते करण्यात आले . प्रमुख म्हणून पो . नाईक सुनिल राठोड , गुरुनाथ राठोड यांची उपस्थिती होती . सदर क्रिकेट स्पर्धा ७ ओव्हरची खेळविण्यात येणार आहे . तर सदर स्पर्धेत १९ संघानी सहभाग नोंदविला आहे . अंतिम विजेत्या संघाला २१००० हजार अशोक राठोड , मोरया कंस्ट्रक्शन शिवाजी नगर दुधनी यांच्याकडून तर उपविजेता संघास ११ ००० जिलानी नाकेदार युवा नेता दुधनी यांच्याकडून देण्यात येणार आहे . सदर स्पर्धायस्ववी करण्यासाठी कमीटीचे महेश चव्हाण , अमोल राठोड , कपिल जन्ना , अझर डिग्गी , गुंडू राठोड इत्यादी प्रयत्न करीत आहेत . या उदघाटनास बहुतांश क्रिकेट प्रेमी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते .

# पात्र गिरणी कामगारांना तातडीने घरे मिळण्यासाठी अधिकच्या घरकुलांची निर्मिती करणार : मुख्यमंत्री शिंदे



मुंबई : गिरणी कामगारांची पात्रता निश्चित करून पात्र कामगारांना घरे देण्यासाठी शासनामार्फत जे निर्णय घेणे आवश्यक असेल ते घेतले जातील, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे सांगितले. विविध योजनांमधून घरे उपलब्ध होत असून सर्व पात्र गिरणी कामगारांना घरे मिळण्यासाठी अधिकच्या घरकुलांची निर्मिती करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) आणि गिरणी कामगार सनियंत्रण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते बॉम्बे डाईंग आणि श्रीनिवास मिल यामधील २५१ पात्र गिरणी कामगारांना घरकुलांच्या चाव्या वाटप करण्यात आल्या.

या कार्यक्रमास मुख्यमंत्र्यांसह उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, कामगार मंत्री सुरेश खाडे, गिरणी कामगार समितीचे अध्यक्ष आमदार सुनील राणे, आमदार कालिदास कोळंबकर, प्रकाश आबिटकर, गृहनिर्माण विभागाच्या अपर मुख्य सचिव वल्सा नायर सिंह, 'म्हाडा' चे उपाध्यक्ष संजीव जयस्वाल, मुख्याधिकारी मिलिंद बोरीकर आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले की, घर हे सर्वांचे स्वप्न असते. मुंबईच्या विकासात गिरणी कामगारांचा सिंहाचा वाटा आहे. पात्र गिरणी कामगारांना घरांच्या चाव्या वाटपाचा २० दिवसांतील हा दुसरा टप्पा असून कामाची ही गती यापुढेही कायम राहणार आहे. यापुढे देखील घर मिळण्यात विलंब होऊ नये यासाठी गिरणी कामगारांची जशी पात्रता निश्चित होईल तसे चाव्या वाटपाचे कार्यक्रम घेण्यात येतील. कामगारांना गिरण्यांच्या जागेवरच घरे देण्याचा प्रयत्न असून गिरणी कामगारांचे घरांचे स्वप्न पूर्ण होत असल्याने कामगारांना आनंद होत आहे. त्यांच्या आनंदात शासन म्हणून आम्हालाही आनंद असल्याचे त्यांनी नमूद केले. मोदी आवास योजनेप्रमाणे विविध योजनांमधून घरे उपलब्ध होत असून या माध्यमातून मुंबईतून बाहेर गेलेला मुंबईकर पुन्हा मुंबईत आणण्यासाठी प्रयत्न होत असल्याचे ते म्हणाले. आज चाव्या मिळालेल्या गिरणी कामगारांचे त्यांनी अभिनंदन केले.

मुख्यमंत्री म्हणाले की, सर्वसामान्यांना न्याय देण्यासाठी सरकार गतिमानतेने काम करीत आहे. यामुळेच 'सर्वसामान्यांचे सरकार' अशी या सरकारची ओळख आहे.

ज्यांची अंमलबजावणी शक्य आहे असेच निर्णय घेतले जात आहे. सर्वसामान्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी विविध प्रकल्प हाती घेतले जात आहेत. रखडलेले पुनर्विकासाचे प्रकल्प मार्गी लावले जात आहेत. त्याचप्रमाणे 'शासन आपल्या दारी' कार्यक्रमाच्या माध्यमातून एकाच छताखाली योजनांचा लाभ देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, गिरणी कामगारांना हक्काची घरे लवकर मिळावीत यासाठी समिती नेमण्यात आली असून गिरणी कामगारांची पात्रता निश्चित करण्याच्या आणि घरे वाटप करण्याच्या कामाला गती देण्यात आली आहे. यामुळे नक्की किती घरे द्यायची आहेत ते समजून त्यापद्धतीने घरांची उपलब्धता निर्माण करता येईल. आज २५१ गिरणी कामगारांना घरांच्या चाव्या देण्यात येत आहेत.

याचपद्धतीने यापुढे जे पात्र होतील त्यांना तातडीने चाव्या देण्याची सूचना त्यांनी केली. पात्र कामगारांना घरांची उपलब्धता व्हावी यासाठी ठाणे जिल्ह्यात ४३ हेक्टर जमिनीची पाहणी करण्यात आली असून यावर जेथे घरे बांधणे शक्य असेल तिथे घरकुल बांधून तयार करण्यात येतील, असे ते म्हणाले. या माध्यमातून घरांचे स्वप्न पूर्ण होत आहे, हा विश्वास गिरणी कामगारांमध्ये निर्माण केला जात आहे.

ज्यांना आज घरे मिळाली त्यांना शुभेच्छा देऊन ज्यांना अद्याप घरे मिळालेली नाहीत त्यांनाही लवकरच घरे मिळावीत यासाठी प्रयत्न केले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री श्री.पवार म्हणाले की, मुंबई आणि गिरणी कामगारांचे आगळे वेगळे नाते आहे. मुंबईच्या विकासासाठी गिरणी कामगारांनी अतोनात कष्ट घेतले आहेत.

मुंबईबरोबरच देशाच्या जडण-घडणीत तसेच राजकीय, सामाजिक चळवळीत या कामगारांचे मोठे योगदान आहे. घर हा जगण्याचा आधार असतो, नात्यांचा ओलावा असतो. त्याच अनुषंगाने स्वतःचे घर हा गिरणी कामगारांचा हक्क असून त्यांना घरांच्या चाव्या दिल्या जात आहेत याचे वेगळे समाधान आहे.

गिरणी कामगारांसाठी शासनामार्फत मोठ्या प्रमाणात घरांची निर्मिती केली जात असून त्याचे वाटपही होत आहे. त्याचबरोबर केंद्र व राज्य शासनाच्या योजनांच्या माध्यमातून सर्वांना घरे उपलब्ध करून देण्यात येत असून सर्वांना घरे मिळावीत यासाठी प्रयत्नरत राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.गिरणी कामगार समितीचे अध्यक्ष आमदार श्री. राणे यांनी प्रास्ताविकाद्वारे गिरणी कामगारांना घरे मिळवून देण्यासाठी म्हाडामार्फत करण्यात येत असलेल्या उपाययोजनांबाबत माहिती दिली.

# भारतीय संविधानाचा आधार घेत प्रत्येक विद्यार्थिनी शैक्षणिक जीवनामध्ये सक्षम बनण्याची गरज : सुभद्राताई मुळे



नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे :शैक्षणिक कार्याकरिता महापुरुषांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून पिढ्यानपिढ्या वंचित असलेल्या प्रत्येक घटकातील विद्यार्थ्यांनी शिक्षणासाठी पुढे सरसावे शिक्षण वाघिणीचे दूध आहे जो प्राशन करेल तो गुरगुरल्या शिवाय राहणार नाही याच शिक्षणाला आणि याच शिक्षणाची समाजाला खूप मोठी गरज असून आजची विद्यार्थी खूप मोठ्या पदावर शिक्षित झाले पाहिजे संघटित झाली पाहिजे आणि समाजासाठी शैक्षणिक दर्जासाठी गुणवत्तेसाठी संघर्ष केला पाहिजे असे मत दमयंती शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा सुभद्राताई मुळे यांनी व्यक्त केले

नुकताच जिल्हा परिषद कन्या प्रशाला नळदुर्ग या शाळेमध्ये पालक मेळावा आयोजन करण्यात आले होते या आयोजन प्रसंगी त्या प्रमुख वक्त्या म्हणून बोलत होत्या त्यापुढे म्हणाल्या शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी उचित ध्येय आहे गाठणे आणि या ध्येयाबरोबर शैक्षणिक क्षेत्रामध्ये स्वतःला वाहून घेणे त्याचबरोबर विद्यार्थ्यांची गुणवत्ता धारक विद्यार्थी बनणे यामध्ये शिक्षकांचे कौतुक आहे शिक्षणाचा ध्यास घेतला पाहिजे शिक्षणामुळे निर्माण होणाऱ्या पात्रते मुळे गुण व कौशल्यामुळे कोणत्याही पदावर विराजमान होणे शक्य आहे प्रत्येक विद्यार्थ्याने आपलं ध्येय निश्चित केलं पाहिजे तोच विद्याचाख आदर्श नागरिक बनण्यासाठी आदर्श अधिकारी बनण्यासाठी पुरेपूर संविधानाचा आधार घेतशैक्षणिक दृष्ट्या सक्षम बनण्याचा प्रामाणिक प्रयत्न करावा आशा त्या बोलल्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा कोंडाबाई शिवाजी गायकवाड ह्या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून शालेय शिक्षण समितीचे सदस्य तथा पत्रकार दादासाहेब बनसोडे लहुजी शक्ती सेनेचे उस्मानाबाद जिल्हाध्यक्ष शिवाजी गायकवाड युवा नेते विश्वास राणे गोविंद राठोड आधी जण उपस्थित होते. या कार्यक्रमात सहशिक्षिका शीघ्र कवी कविता पुदाले सहशिक्षक मिलिंद कुलकर्णी सहशिक्षिका कौरव यांचा दहावीत गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला यावेळी नळदुर्ग शहरातील पालक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक कमलाकर गायकवाड यांनी केले सुभद्राताई मुळे दादासाहेब बनसोडे शिवाजी गायकवाड विश्वास रणे आदीने विद्यार्थ्यांना व पालकांना उत्तम प्रकारे मार्गदर्शन केले या कार्यक्रमास परिसरातील दोन तीन किलोमीटर अंतरावरणाचे विद्यार्थिनी पाई चालत ये जा करतात अशा पायी चालत येणाऱ्या विद्यार्थिनींना सायकलीची वाटप करण्यात येणार असून सदरील प्रस्ताव संबंधित विभागाकडे पाठविण्यात आलेला आहे कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सतीश भाऊ जाधव यांनी केले तर शेवटी आभार सहशिक्षि .का गावित यांनी मांडल्या कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहशिक्षक आता मिलिंद कुलकर्णी सहशिक्षिका गौरव सिद्धेश्वर जाधव दत्तात्रय सगर आदींनी परिश्रम घेतले

# प्रथम वर्ष इंजिनिअरिंग प्रवेशासाठीच्या कॅप रजिस्ट्रेशन प्रक्रियेला दुसऱ्यांदा मुदतवाढ

पंढरपूर/प्रतिनिधी : शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता प्रथम वर्ष इंजिनिअरिंग प्रवेशासाठी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून स्वेरी अभियांत्रिकीला फॅसिलिटेशन सेंटर (एफ.सी. ६२२०) म्हणून मान्यता मिळालेली असून 'प्रथम वर्ष अभियांत्रिकी (पदवी) च्या प्रवेशासाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशन प्रक्रिया दि.२४ जून २०२३ पासून सुरु झाली असून ऑनलाईन प्रवेश अर्ज भरणे, कागदपत्रे पडताळणी व छाननी आदी बाबी सुरू झाल्या होत्या. या प्रक्रियेला दि.०७ जूलै २०२३ पर्यंत मुदत होती परंतु दिलेल्या अवधीत अनेक विद्यार्थ्यांची कागदपत्रे व प्रमाणपत्रे उपलब्ध झाली नाहीत त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान टाळण्यासाठी या रजिस्ट्रेशन प्रक्रियेला राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून पुन्हा मुदतवाढ देण्यात आली असून आता सोमवार दि.१० जुलै २०२३ पर्यंत सदर रजिस्ट्रेशन करता येणार आहे.' अशी माहिती स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी दिली.




स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या नियोजनात्मक मार्गदर्शनाखाली स्वेरी अभियांत्रिकी मध्ये ऑनलाईन रजिस्ट्रेशनची सुविधा मोफत उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. अभियांत्रिकी (पदवी) महाविद्यालयात प्रथम वर्ष प्रवेशासाठीची रजिस्ट्रेशन प्रक्रिया दि.२४ जून २०२३ पासून सुरू झाली होती. या प्रक्रियेला आता दुसऱ्यांदा मुदतवाढ मिळाली असून आता ही प्रक्रिया सोमवार, दि.१० जुलै २०२३ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत चालणार आहे. त्यानंतर भरलेल्या अर्जाच्या संदर्भातील कागदपत्रे व प्रमाणपत्रे यांची पडताळणी करून खात्री करणे यासाठी मंगळवार, दि. ११ जुलै २०२३ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत मुदत दिली आहे. स्वेरी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे हे रौप्य महोत्सवी वर्ष असून स्वेरीचा शैक्षणिक क्षेत्रातील चौफेर विकास पाहून स्वेरी अभियांत्रिकी ला प्रवेश प्रक्रिया केंद्र (एफ.सी. क्र.-६२२०) म्हणून मान्यता दिली आहे. मुदतवाढ मिळाल्यामुळे आवश्यक कागदपत्रे व प्रमाणपत्रे या अभावी प्रवेशापासून वंचित राहणाऱ्या विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे. रजिस्ट्रेशनसाठी येताना विद्यार्थ्यांनी आपल्या प्रवर्गानुसार असलेली सर्व मूळ कागदपत्रे घेऊन यावीत तसेच सीईटी परीक्षेसाठी रजिस्टर केलेला मोबाइल/नंबर सोबत असावा. 'सदरची नोंदणी यशस्वीपणे आणि बिनचूकपणे केलेले विद्यार्थीच शासनाच्या कॅप राऊंडसाठी पात्र राहतील. सदर कॅप राऊंड मधून प्रवेशित विद्यार्थीच शासनाच्या वेगवेगळ्या सवलती घेण्यास पात्र राहतील. त्यामुळे ही प्रवेश नोंदणी प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची असून सर्व विद्यार्थी व पालकांनी स्वेरीत येऊन ही प्रक्रिया येथील तज्ञ शिक्षकांमार्फत पूर्ण करून घ्यावी.' असे आवाहन प्रवेश प्रक्रियेचे अधिष्ठाता प्रा.करण पाटील यांनी केले आहे. महाराष्ट्र शासनाच्या राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या https://cetcell.mahacet.org या संकेतस्थळावर प्रवेश प्रक्रियेबाबत सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे. अभियांत्रिकीच्या प्रवेशासंदर्भात अधिक माहितीसाठी अधिष्ठाता प्रा.करण पाटील (९५९५९२११५४), प्रथम वर्ष अभियांत्रिकीचे विभागप्रमुख डॉ.सतीश लेंडवे (९५४५५५३८७८) व प्रा. यु.एल.अनुसे (९१६८६५५३६५) या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

# नमस्ते नाशिक फाउंडेशन वतीने आदर्श शाळा उंबरठाण येथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक व पावसाळी साहित्य वाटप

नाशिक : जिथे कमी तेथे आम्ही या युक्तीवर चालणाऱ्या नमस्ते नाशिक फाउंडेशन नाशिक यांच्याकडून आदर्श शाळा उंबरठाण येथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक व पावसाळी साहित्य वाटप.नमस्ते नाशिक फाउंडेशन नाशिक संस्थेतर्फे जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा उंबरठाण तालुका सुरगाणा जिल्हा नाशिक या दुर्गम आदिवासी भागातील शालेय विद्यार्थ्यांना, शालेय उपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले त्यामध्ये रेनकोट, छत्री, वह्या अशा विविध प्रकारचे साहित्य वाटप करण्यात आलेले आहे. शाळेतील २४० विद्यार्थ्यांना नमस्ते नाशिक फाउंडेशन संस्थेच्या अध्यक्षा स्नेहल देव, सुनिता वाणी, संदीप देव,रिदम, साहिल ,भूषण तलवारे यांच्या हस्ते शालेय विद्यार्थ्यांना साहित्याचे वाटप करण्यात आले कार्यक्रमाप्रसंगी उंबरठाण बीटाच्या शिक्षण विस्तार अधिकारी डॉ नेहा शिरोरे मॅडम, पंचायत समिती सदस्य विजय घांगळे, सरपंच गिरीश गायकवाड, उपसरपंच शिवराम गावित, सदस्य माधव पवार ग्रामपंचायत सदस्य, पेसा



कमिटी अध्यक्ष सुरेश चौधरी, आदर्श शाळेचे मुख्याध्यापक लक्ष्मण बागुल, मधुकर खोटरे, आदी मान्यवर उपस्थीत होते. कार्यक्रम पार पाडण्यासाठी मंजुळा गावित, जयराम धूम, मनोहर चौधरी, राजेंद्र गावित, सुमित्रा जाधव, संगीता भोये, राहुल सावळे, योगिता महाले, सिताराम वळवी, पंडित गावंडे, भागा चौधरी आधी शिक्षक वृंदांनी विशेष परिश्रम घेतले. विजय इंगळे व गिरीश गायकवाड यांनी मनोगत व्यक्त करताना संस्थेचे आभार मानले. तसेच सूत्रसंचालन राजेंद्र गावित यांनी केले.

# परभणी येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास केंद्र सरकारची मान्यता

मुंबई : परभणी येथील १०० विद्यार्थी क्षमतेच्या नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्न असलेल्या ४३० रुग्णखाटांच्या रुग्णालयास केंद्र सरकारची मान्यता मिळाली असून या शैक्षणिक वर्षांपासून प्रवेश सुरू होणार आहे. राज्यातील हे २५ वे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्यात आले असल्याची माहिती ग्रामविकास व पंचायत राज, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य आणि क्रीडा व युवक कल्याण मंत्री गिरीष महाजन यांनी दिली.

वैद्यकीय शिक्षण मंत्री श्री. गिरीष महाजन म्हणाले की, स्वातंत्र्यानंतर मागील जवळपास ६० वर्षात केवळ ११ शासकीय वैद्यकीय महाविद्यालये सुरु करण्यात आली होती. तर २०१४ ते २०२३ पर्यंत ९ वर्षात १० शासकीय वैद्यकीय महाविद्यालये राज्यात सुरु करण्यात आली आहेत. त्यामुळे दरवर्षी हजारो नवीन डॉक्टर्स तयार होवून राज्यभर आरोग्य सेवेचा विस्तार होणार आहे. परभणी येथील वैद्यकीय शैक्षणिक प्रवेशाचा मार्ग मोकळा झाला असून मागील ९ वर्षातील ११ वे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु झाले आहे. तसेच ज्या जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालये नाहीत अशा ९ जिल्हांमध्ये नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालये सुरु करण्याच्या प्रस्तावास मंत्रिमंडळाने मान्यता दिल्याने प्रत्येक जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालये सुरू होणार आहेत.